जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 AUG 2025
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित स्वातंत्र्यसैनिकांच्या माहिती प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याहस्ते झाले. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. केशव राजपुरे, चंद्रकांत शहासने आदींसोबत विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# स्वातंत्र्यसैनिकांच्या २ हजार दुर्मिळ छायाचित्रांच्या प्रदर्शनास प्रतिसाद

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामार्फत ऑगस्ट क्रांती दिनाच्या निमित्ताने भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांच्या कार्याची माहिती असणाऱ्या सुमारे २ हजार दुर्मिळ छायाचित्रांच्या प्रदर्शनास उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

पुणे येथील जयहिंद फौंडेशन आणि कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त

- शिवाजी विद्यापीठात आयोजन
- प्रदर्शनाद्वारे उलगडली क्रांतिकारकांची शौर्यगाथा

विद्यमाने हे प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रदर्शनाचे संकल्पक चंद्रकांत शहासने यांनी यांनी संग्रहित केलेल्या माहितीमधून संपूर्ण भारतातील क्रांतिकारकांची शौर्यगाथा या प्रदर्शनाद्वारे उलगडली. महाराष्ट्रातील आदिवासी क्रांतिकारकांसह पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा व विदर्भातील स्वातंत्र्यसैनिकांच्या कार्याचा विस्तृत आढावा या अंतर्गत घेण्यात आला आहे. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी क्रांतिकारकांनी केलेला त्याग, दिलेले बलिदान, दाखवलेले धैर्य आणि चिकाटी याचे एक प्रेरक चित्र या प्रदर्शनात मांडलेल्या माहिती फलकांमधून दिसले.

कोल्हापूर आणि परिसरातील शाळा, महाविद्यालयांतील शिक्षक, विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांनीही या प्रदर्शनाला भेट दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटीले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 AUG 2025

लोकमत



शिवाजी विद्यापीठात शनिवारी ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त शहीद क्रांतिकारकांना क्रांतिवनातील स्मृतिस्थळावर पुष्पचक्र अर्पण करून कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अभिवादन केले.

# शिवाजी विद्यापीठात शहीद क्रांतिकारकांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शनिवारी ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त शहीद क्रांतिकारकांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या क्रांतिवनातील स्मृतिस्थळावर पुष्पचक्र अर्पण करून कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के आणि कुलसचिव डॉ.व्ही.एन. शिंदे यांनी अभिवादन केले.

यावेळी कवी कुसुमाग्रज यांच्या 'अनाम वीरा...' या कवितेचे सामूहिक वाचन करण्यात आले आणि राष्ट्रीय एकात्मतेची शपथही घेण्यात आली. यावेळी वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.श्रीकृष्ण महाजन, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ.सागर डेळेकर, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ.तानाजी चौगुले, क्रीडा संचालक डॉ.शरद बनसोडे, डॉ.भारती पाटील, संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ.शशीभूषण महाडिक, सुरेखा अडके यांच्यासह अभियांत्रिकी, उद्यान, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास विभागाचे सहकारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 AUG 2025
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या क्रांतीवनातील स्मृतीस्थळावर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करताना मान्यवर.

# शिवाजी विद्यापीठात क्रांतिकारकांना अभिवादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात आज शहीद क्रांतीकारकांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या क्रांतीवनातील स्मृतीस्थळावर पुष्पचक्र अर्पण करून कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी अभिवादन केले.

यावेळी कवी कुसुमाग्रज यांच्या 'अनाम वीरा..' या कवितेचे सामूहिक वाचन करण्यात आले आणि राष्ट्रीय एकात्मतेची शपथही घेण्यात आली. यावेळी डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सागर डेळेकर, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे, डॉ. भारती पाटील, डॉ. शशीभूषण महाडिक, सुरेखा अडके आदींसह अभियांत्रिकी, उद्यान, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास विभागाचे सहकारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 AUG 2025
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात क्रांतिकारकांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शनिवारी ऑगस्ट क्रांतिदिनानिमित्त शहीद क्रांतिकारकांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या क्रांतिवनातील स्मृतिस्थळावर पुष्पचक्र अर्पण करून कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी अभिवादन केले. यावेळी कवी कुसुमाग्रज यांच्या 'अनाम वीरा..' या कवितेचे सामूहिक वाचन करण्यात आले आणि राष्ट्रीय एकात्मतेची शपथही घेण्यात आली. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. भारती पाटील, संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक, सुरेखा अडके यांच्यासह अभियांत्रिकी, उद्यान, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास विभागाचे सहकारी उपस्थित होते.